म. ग्रं. सं. ठाणें.

विषय काव्य

९०८/१

९०३

काव्य.

म. ग्रं. सं. ठाणें ९०३

सन १८८९

विषय काव्य

लेखक ना. वि. राजे

संग्रहालय क्रमांक ९०८

पुस्तकाचें नांव संगीत सुधन्वाचरित्र

१९४१

क्रमांक २

अस

Chanubal 5/7/85.

# संगीत सुधन्वा चरित्र.

क्रं ९७६/९

(संगीत नाटकां प्रमाणें मनरंजनास उपयोगीं पडणारें.)

स्वस्तदरानें विकण्याकरितां तयार
केलेली आवृत्ति.

मुंबई.

किंमत २॥ आणे.

वा. काव्य
१८०७१

# प्रस्तावना

सांप्रत आमच्या प्रभुच्या कारकिर्दीत कांहीं विषयांवर थोडे थोडे ग्रंथ महाराष्ट्र भाषेत प्रसिद्ध झाले आहेत; व आणखी नवीन ग्रंथ करण्याचा क्रमही सुरूं आहे. आमचे स्वदेशबांधव अनेक विषयांवर झालेले ग्रंथ वाचून त्यापासून ज्ञानप्राप्ति करून घेण्याचें कामीं आलिकडेस बरेच झटत आहे त. त्यामुळें त्यांतील कित्येक लोकांस उत्तेजन येऊन त्यांहीं महाराष्ट्र भाषा सुधारण्याचें व त्या भाषेत अनेक विषयांवर नवीन ग्रंथ लिहिण्याचें काम पत्करिलें आहे. हा एक ह्या प्रभुचे कारकिर्दीत लाभ होत चालला आहे खरा; परंतु आमच्या पुरातन पुराणांतही थोड्याबहूत ज्या कांहीं गोष्टी आहेत त्यांचा मात्र लोप होत चालला आहे, असें ह्मणण्यास बिलकूल चिंता नाहीं. मग त्या असंभवनीय वाटतात ह्मणून किंवा त्या एकाच छंदांत ( ओव्याबद्ध ) लिहिलेल्या असल्यामुळें लोकांस आवडत नाहींत ह्मणून असा प्रकार होत चालला आहे किंवा काय हें उघड समजत नाहीं. परंतु हा माहित नसणें हें मात्र रास्त दिसत नाहीं.

लोकांनीं आपल्या पुराणाच्या ग्रंथांचा संग्रह करून

ठेवणें ह्मटलें ह्मणजे साधारण प्रातिचे लोकांस ही गोष्ट त्यांशक्ती बाहेर आहे; हें उघड दिसतें. या कारतां त्यांतील चमत्कारिक व मनरंजन होण्यासारख्या अशा चांगल्या विषयांवर ज्या गोष्टी असतील त्यांची निरनिराळी पुस्तकें झालीं असतां सर्वांस घेण्यास सोईवार पडतील किंवा नाहीं हें सांगावयास नकोच. आतां या गोष्टी एकाच छंदांत लिहिल्या असल्यामुळें रसिकजनांस वाचण्यास कदाचित कंटाळा येत असेल, असें समजून हें ' सुकन्या चरित्र ' अनेक छंदांत तयार केलें आहे. ह्यांत शृंगार, वीर, करुणा इत्यादिक रसांचा जाचा बराच समावेश आहे. ह्यास जास्त गोडी यावी ह्मणून मूळकथेस विरोध न येण्यासारखे ह्याच्या रचनेंत कांहीं कमज्यास्त फेरफार केलें आहेत. सदहू पुस्तक कर्त्याचा हा पहिलाच यत्न आहे या करितां माझे देशबांधव ह्यांतील दोषांकडे लक्ष न देतां माझ्या कृत्यास उत्तेजन देऊन हें लहानसें पुस्तक विकत घेतील अशी आशा आहे.

वामन विनायक राजे.

मराठी ग्रंथ संग्रहालय नं. २२६ ठाणे

## श्री गजानन प्रसन्न.

## मंगलाचरण.

### पद.

मंगळकर शुंडधरळ शंभुबालका ॥ सुरवर पद कमळीं रत लंबनासिका ॥ धृ० ॥ चरण दाव त्वरित पाव बुद्धि दायका ॥ मंदमती छंद अतो कितनीं मुका ॥ लीन दास मी उदास हृदयचाळका ॥ स्तवनीं भजनीं पुजनीं हरुनि भया करुनि दया स्मरुनि तया पात्र जगसखा ॥ १ ॥ मंगळकर शुंड० ॥ संचयास उगा ज्यास भक्तिहारका ॥ ह्मणुनि तार एक वार दीनबालका ॥ शरण तुला अभय मला दे सदां सुखा ॥ भावें ध्यावें गावें वक्रतुंड स्थूळगंड दिव्यशुंड विघ्ननाशका ॥२॥ कृपावंत काय अंत पाहसी फुका ॥ धांव त्वरें विघ्नहरा भक्त तारका ॥ तुझ्याविण होय शीण व्यर्थ बालका ॥ दमलों श्रमलों करुनि नमन धरुनि चरण दुरित हरण करि विनायका ॥ ३ ॥ मंगळकर शुंड० ॥

### भुजंगप्रयात

असो बुद्धि कोती तरी या जनाची ॥

बहू आवडी कीर्तें गाकें हरीची ॥
कसेंही असो साह्य हो याच कामीं ॥
पदीं लागलें शारदेगे तुझ्या मी ॥
रती नायकाचा पिता दास झाला ॥
नईं भक्ति भावें हरी आकळीला ॥
जयांहीं कृपेनें जनां उद्धरीलें ॥
अशा संत माधूंस म्या वंदियेलें ॥

## पद

स्मररे स्मर हृदया शंकर भोळा, धर वदनीं चाळा ॥
गोड गोड वद मृत्युंजय हर ध्याईं निरंतर शिव जपे माळा ॥
॥ धृ० ॥ तो हा विश्वरूप अवतरला ॥ मायेनें वरिला ॥
ज्यानें शिव सगुण रूप धरिला ॥ तो तर नर तरला ॥
धांव धांव मन पाव त्वरित जरि भाव असो गिरिजा वेल्हाळा ॥
॥ १ ॥ स्मररे० ॥

## भुजंगप्रयात

रची ब्रह्म गोळा वदे वेद वाणी ॥
रवी चंद्र तारांगणें आणि प्राणी ॥
असा जो धनी सर्व विश्वंभराचा ॥
नमस्कार माझें पदीं वामनाचा ॥ ९ ॥

आ. ९९७९



श्लोक ( शार्दुल विक्रीडीत )

बोले जैमिनि सावधान बसुनी जन्मेजया ऐकरे ॥
श्रीव्यासें कथिली सविस्तर कथा तातासि अत्यादरें ॥
ती तैसी तुजला कथा कथिन मी लागो बहू गोड ते ।
जीच्या बा श्रवणें क्षुधाहि हरते पुंण्यास कीं जोडिते ॥ ६ ॥

दिंडी

गोत्र हत्येचें पाप लया जातें ॥
धर्म राया तूं ऐक उपायातें ॥
म्हणुनि व्यासें बोधिलें पांडवांसी ॥
अश्व मेधादिक यज्ञ करायासी ॥ ७ ॥

श्लोक ( शार्दुल विक्रीडित )

सोडी अश्व मही युधिष्टिर तया रक्षावया अर्जुना ॥
धाडी आणि करी सवें यदुपती जावें अशी प्रार्थना ॥
श्रीकृष्णें अभयास देउनि म्हणे आहे तुला साह्य मी ॥
जीष्णूतें पडतांच संकट तरी तात्काळ जाईन मी ॥ ८ ॥

अंजनी गीत

जिष्णू संगें अपार सैन्य !! वृषकेतू तो कर्ण नंदन ॥
यादव कुळींचाही प्रद्युम्न ॥ जाती साह्यासीं ॥ ९ ॥

राजे जिंकी वसु अवनीचे ॥ चिंतन करुनी त्या यदुपतिचें॥
इच्छामात्रे धनंजयाचें ॥ संकट जो वारी ॥ १० ॥

श्लोक ( मालिनी )

फिरत फिरत आला अश्व तो अर्जुनाचा ॥
ह्मणति सकळ ज्यासी चंपकापूर वाचा ॥
नगर नृपतिच त्या नांव हंसध्वजाहे ॥
धरुनि त्वरित वारु सेवकें बांधिलाहे ॥ ११ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा )

पाहून योद्धे समरास आले ॥ संतप्त क्रोधं अति सर्व झाले ॥
किं सर्प पुच्छावरि पाद देतां॥तात्काळ चावे धरुनी अहंता॥१२

आर्या

इकडे हा हंसध्वज मंत्री पुत्रां सभेत पाचारी ॥
सांगे अर्जुन आला साह्य करी नित्य ज्यास कंसारी ॥ १३
ह्याशी समर करावा किंवा हा अश्व काय सोडावा ॥
सांगा कीर्ति सागर कीं तो श्रीकृष्ण देव जोडावा ॥ १४
प्रधान सुमती वदला युद्धीं कीर्ति करुनि हो काया ॥
सोडुनि स्वास विदेही श्रीपरमात्माही जोड गा राया ॥ १५
ज्या सदुपायें दोन्ही गोष्टी घडतील असेंच कर बापा ॥
अविचार शत्रु नच हा देवा तुझीया मनांत संतापा ॥ १६

 काव्य ९५०३

श्लोक ( वसंत तिलका )

ऐशा परी परिसुनी वदलाही राया ॥
युद्धास सिद्ध असणें नलगे कथा या ॥
शूरास भूषण गमे समरीं मरावें ॥
क्षत्रीय धर्म धरितां मग काय भ्यावें ॥ १७ ॥

आर्या

सव्वा प्रहरीं उदायिक येईना जो रणास ही शिक्षा ॥
पावेल तप्ततेलीं तनुची होईल जावरी रक्षा ॥ १८ ॥
माझी हीच प्रतिज्ञा मोडूं शकतिं कठीण देवांना ॥
आज्ञा करुनी ऐशी रायें दिधला निरोप सर्वांना ॥ १९ ॥

कामदा

चंपका पुरीं नाद कोंदला ॥ युद्ध युद्ध हा शब्द जाहला ॥
स्वार सैन्य ही शिघ्र पातले खड्ग घेउनी वीर धांवले ॥ २० ॥

आर्या

पांची तनयांमाजी वीर सुधन्वा कनिष्ट भूपतिचा ॥
होता थोर पराक्रमि तैसा प्रिय भक्त होय यदुपतिचा ॥ २१

पद ( साधन नामची सार या चालीवर )

स्यंदन सिद्ध करी ॥ झडकरी स्यंदन सिद्ध करी ॥ धृपद॥

वीर सुधन्वा बोले सुता आज्ञा मान्य करी ॥ १ ॥
शस्त्रास्त्रादिक सर्वही नूतन घई संगें वरी ॥ २ ॥
दिव्य रथासीं सुंदर वारू जोडुन सज्ज करी ॥ ३ ॥
आज पित्याची घोर प्रतिज्ञा हृदयीं स्मरण धरीं ॥ ४ ॥
फार त्वरेनें कटकीं मिळुनी जावें शत्रू वरी ॥ ५ ॥
मातोश्रीचें दर्शन घेतां देईल अभय तरी ॥ ६ ॥
सुता प्रति हें सांगून ऐसें गेला जननी घरीं ॥ ७ ॥ २२ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा )

मातेस तेव्हां प्रणिपात केला ॥ भेटावया हा जिवगे भुकेला ॥
आलों ह्मणूनी तव दर्शनाला ॥ बोलूनि ऐसें धरिलें पदांला ॥ २३
आज्ञा मला दे समरास जानों ॥ विलंब होतां मजला पिता तो ॥
देईल ऐसें न घडो कदांही ॥ इच्छी मला तूं जाय गे सदांही ॥ २४

मंदाक्रान्ता

बोले माता परिस तनया अल्प बुद्धीस सोडी ॥
युद्धांमध्यें सबळ रिपूची सर्वथा खोड मोडी ॥
पंडुचाही कुमर वधुनी शत्रू सैन्यास झोडी ॥
किंवा तूंही मरुनि समरीं थोर कितींस जोडी ॥ २५

दिंडी

ह्मणे बाळा तूं जाइजे रणाला ॥

क्र. १६५

असें साह्याती कृष्ण अर्जुनाला ॥
ह्मणुनें वाटेरे खांत या मनाला ॥
कठिण मिळणें हो यश आपणांला ॥ २६ ॥
तरी युद्धीं त्वां विन्मुख न हो यावें ॥
रणीं शत्रूशीं समूळ हाटवावें ॥
तुझे पूर्वज मातुळ कसे हाते ॥
ऐक त्यांचा वृतांत सर्व देत्यें ॥ २७ ॥
कथा सांगे ती सर्वही तयाला ॥
इंद्रलोकीं ही पावले जयाला ॥
नाहिं स्वप्नीं ही पराजीत झाले ॥
असे त्यांहीं लौकीक मेळवीले ॥ २८ ॥

पद ( भक्तासी भगवद्भजनें भवसागर या चालीवर )

कुळ दीपक माझ्या बाळा ॥ कार्य करी तूं जननीचें ॥ ध्रुपद
दुःखवी तिला यदुरागा ॥ जन्मलास उदरीं जीचें ।
या कीर्तिरणीं संपादी ॥ भूषण हो तूंच कुळाचें ॥ १ ॥
थोर माय मजरे भुवनीं ॥ जना मुखें वदवी साचें ॥
इच्छा ही सिद्धिस जातां ॥ सार्थक तुज जन्म दिल्याचें ।२।२९

श्लोक

ऐकून आज समरांत पराक्रमातें ॥

गातील सर्व जनहो मजलागि पाते ॥
मी वीर पुत्र मज जींवे गजा वधाया ।
कोणीच सिंह शिशुला नलगे कथाया ॥ ३० ।

श्लोक ( भुजंग प्रयात वृत्त )

रणीं जा पिता वाटपाहील तूझा ॥
तुझी कीर्ति वाढो असा बोल माझा ॥
असें एकुनी तो सुधन्वा रणाला ॥
त्वरें सिद्ध झाला पुढें जावयाला ॥ ३१ ॥

श्लोक ( शुद्धकामदा वृत्त )

प्रगटली अशी मात मंदिरीं ॥ करि प्रभावती खेद अंतरीं ॥
समर हा सखे घोर वाटतो ॥ बहुतग मनीं मोह दाटतो ॥३२॥

साकी

विरह मला ऐसा ॥ दुःसह दुःख देत कैसा ॥ धृ० ॥
प्राणपतीगे नित्य मंदिरीं माझ्या शेजे वरती ॥
असती क्रीडे करितां तरि मग कां ते आज विसरती॥३३
रजस्वला मी आज नाहलें दिवस असे गे चवथा ॥
पति भेटी विण जातां वाटे वीज पडे कीं माथा ॥ ३४ ।
शृंगारूनि हा महाल मंचकीं नाहीं प्राणविसावा ॥
कसा पनाचे हेतु सखेगे प्राणपती भेटावा ॥ ३५ ॥

सखे ललीते जाउनि सांगे माझा निरोप त्यांना ॥
भेटुनि आधीं प्रिय भार्येला मग कां समरीं जाना ॥ ३६ ॥
मंदिर माझें पाहुनि होतें दुःखि जनाला सूख ॥
परंतु तेव्हां द्विगुणित वाटे विरहि जनाला दुःख ॥ ३७

दिंडी

असे रचना ह्या दिव्य मंदिराची ॥
अष्ट पैलू विस्तीर्ण हो तऱ्हेची ॥
इंद्र गंधर्वा नवल थोर वाटे ॥
तेंच भासत मज घोर रान मोठें ॥ ३८ ॥

श्लोक ( शार्दूल विक्रीडित )

हंड्या झूमर लोंबती तसबिरा नानाकृती भासती ॥
वीणा वाद्य मृदंग टाळ मुरली सारंग ही शोभती ॥
भारद्वाज मयूर चातक बहू कोकील पक्षी किती ॥
गंव हंस मृगादि व्याघ्र हरणें पाळींव हीं खेळती ॥ ३९ ॥

श्लोक ( शालनी )

ठाईं ठाईं रेखिलीं रम्य चित्रें ॥ ठाईं ठाईं ठेविलीं वाद्य यंत्रें ॥
ठाईं ठाईं शोभती दास दासी ॥ कां गे होतें चित्त माझें उदासी ॥ ४०

ओंवी

रंगमहाल हें आकाश देख ॥ हंड्या झुमरें नक्षत्रें सुरेख ॥

संवरू मेघामध्यें मुख ॥ चंद्रमा म्लान जाहला ॥ ४१ ॥

श्लोक ( भुजंग प्रयात )

मनीं थोर चिंता वसे त्या सतीच्या ॥
पलंगावरी स्तब्ध बैसे पतीच्या ॥
जणूं जात आहे विमानीं बसूनी ॥
पहा चंद्र आकाश मार्गे क्रमूनी ॥ ४२ ॥
नसे चंद्रमा हा असे शूळपाणी ॥
बहू थोर लीला जयाची पुराणीं ॥
बसे आजि गौरी वरी तो रुसूनी ॥
तपालागिं सेवावया घोर रानीं ॥ ४३ ॥
जटेचा शिरीं भारही दिव्य साजे ॥
तशी मस्तकीं मूद गंगा विराजे ॥
उटी चंदनाची जणूं भस्म अंगीं ॥
अशी सांब मूर्ती दिसे ती पलंगीं ॥ ४४ ॥
कपाळावरी चांदवा चंद्र साजे ॥
तसा नेत्र कुंकूहि भाळीं विराजे ॥
गळां हार ते सर्प हो पीत रंगी ॥
अशी सांब मूर्ती दिसे ती पलंगीं ॥ ४५ ॥
करीं कंकणे थेट रुद्राक्ष माळा ॥
तसा पीतरंगें दिसे कंठ नीळा ॥

पहा व्याघ्रचर्में जणूं शल अंगीं ॥
अशी सांब मूर्ती दिसे ती पलंगीं ॥ ४६ ॥

आर्या

होतां सावध आतां स्वस्थ न बसणें ह्मणे ललीतेला ॥
माझ्या दुःखाग्नीवर कैसें हें म्याच ओतिलें तेला ॥ ४७ ॥

श्लोक ( मालिनी वृत्त )

ममपति भगिनीला ऐक माझा निरोप ॥
क्षणभरी तरी यावें सोडुनी सर्व कोप ॥
ह्मणुनि मग जिवींचें दुःख सांगावयासीं ॥
त्वरित कुवलयेच्या धाडिलें मंदिरासीं ॥ ४८ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा )

दासीमुखें वृत्त हि ऐकियेलें ॥ तेव्हां तिनें जे सदुपाय केले ॥
बोले सुधन्व्यास घरांत आधी ॥ भार्येस भेटून रणास साधीं ॥ ४९

आर्या

वीर सुधन्वा तेव्हां वेगें सदनास जाय भार्येच्या ॥
मन कामना पुरवी तो तत्पर श्रीकृष्ण जेविं भामेच्या ॥ ५०

पद ( देतों मी वचन तुह्माला या चालीवर )

येतांहो पति सदनाला ॥ आनंद होय प्रमेला ॥ ध्रु० ॥

माई त्वरेनें ती लगेरी ॥ लागत पति चरणाला ॥ १ ॥
प्रेमळ भावें धरिलें करारीं ॥ बोलत मृदु वचनाला ॥ २ ॥
नोडुन का ती विनवी तयाला ॥ धीर नसे अबलेला ॥ ३ ॥
होऊं किती उतराई तुझाला ॥ दैवें सुदिन उदेला ॥ ४ ॥ ९१

## दिंडी

प्रथम वंदुनी पाद दों करांनीं ॥
काय केले खोंदून नौकरानीं ॥
आज भार्येची भूल कशी झाली ॥
प्रांत द्रव्यांचा ठेव सांडियली ९२

## श्लोक ( मालिनी वृत्त )

दिनकर उदयाची वेळ काते चुकेल ॥
तदुपरी जलधीची शीत्र ही पालटेल ॥
हारे जारे निज भक्तां संकटीं नाठवेल ॥
तरि न प्रिय सखाच्या सूचना हा टळेल ॥ ९३ ॥

## श्लोक ( भुजंग )

नसे वेळगे हीच बोलावयाची ॥
मला आस मटो रणीं हो जयाची ॥
परी तोस आलिंगनालागीं देतो ॥
प्रियाची प्रतिज्ञा हि तेव्हां वदे तो ॥ ९४ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा )

आहेत मंत्री जन कारभारी ॥ विख्यात युद्धीं मग साहकारी ॥
चिंता मनी ती नलगे कराया ॥ संसार माया जलधी तराया १५

श्लोक ( मणीबंध )

पुत्र दिव्या जो समरीं ॥ साह्य करीना व्यर्थ तरी ॥
जन्मुन मातेच्या उदरीं ॥ कोकिल पक्षी जाय दुरी ॥ १६
हांसत गाली ती सुमती ॥ बोलतसे हो प्राणपती ॥
तांबुल साहो एक तरी ॥ हार तुरा घ्या जा समरीं ॥ १७

पद ( राहिना गोविंद राधे तुझ्या गृही नेई )

राहुं दे सुगंधी प्रभे पिता पुढें गेला ॥ धृपद ॥
कीर्ति पती घाली माळा ॥ प्राणप्रिये माझ्या गळां ॥
व्यर्थ लाविसी कां चाळा ॥ गुंतुनी मोहाला ॥ १
होतां आज विलंबातें ॥ क्रोध येइ मत्पित्यातें ॥
तेव्हां वदूं कैसा त्यातें ॥ देई निरोपाला ॥ २
धरी विनोदें तो तिजसी ॥ वळं घेई चुंबनासी ॥
वदे काय प्रभावतिसी ॥ आनंद शोभाला ॥ ३ ॥ १८

साक्या

प्रभावती मग मृदु मृदु वचनें बोले प्राणपतीला ॥
प्रभुजीला मी नवस कारितसें दे ऐशा सवलीला ॥ १९ ॥

कुरवाळुनियां कुरळ केश तो हात मुखावर फिरवी
क्षणेक माझा वियोग-सा जुनी मनास सखये रिझवी

### श्लोक ( शार्दुल विक्रीडित )

दैवाची करणी सतेज तरणी राहू गिळी आननीं ।
जो इच्छामरणी धनंजय रणीं जिंकी तया लागुनीं
कैसी हो जननी तुझा प्रसवुनी नाहीं दया कीं मनीं
रामद्वेष मनीं सपत्न म्हणुनी प्रेषी तया काननीं ॥ ६

### केका ( पृथ्वी वृत्त )

सखे वदासि कां असें वचन फार निष्ठूरसें ॥
तुलाच कुचले कसें अनित वाक्य हें तों दिसे ॥
तुलाहि ममता खरी तरि न शब्द माते परी ॥
सुवास बहुतो परी सार नयेच आ कस्तुरी ॥ ६

सती न उलट मनीं भिवुनि मंडुका केशरी ॥
न भीरु समरंगणीं न च वसन अंत:पुरीं ॥
क्षणेक बस एकटी पडुं नको कदां ह्या हटीं ॥
प्रसंग बघ शेवटीं मम पिता पडे संकटीं ॥ ६३

किमर्थ निज अंतरीं प्रियकरा व्यथा ही तरि ॥
मला अभय द्या करीं कथिन सर्व त्या नंतरी ॥

येहा नजिक नोवरी असुनि कां दिसे बावरी ॥
कसें न हृदयीं धरा करु विलास शेजे वरी ॥ ६४

श्लोक ( भुजंग )

ह्मणें आज जाणें असे कृष्ण भेटी ॥
मनाची असे सर्वथा आस मोठी ॥
शरें पंच जिंकीन मी कृष्ण पार्थ ॥
तया नंतरी तो करूं पूर्ण अर्थ ॥ ६५

पद चाल ( खरि झाली दृष्ट माझ्या श्रीहरिला )

पति राया परिसावें मम वचना स्पष्टतें ॥
क्षण एक थांबुनिया मग जा मी इच्छितें । धृ० ।
श्रीहरी दर्शनाची बहु इच्छा दीसते ॥
जे गेले कृष्ण भेटी परत आले कोणते । १ ।
अति दुस्तर दुःखरूपी मन संसारा वीटते ॥
यास्तव मी विनवितें आस मनिची राहते । २ ।
लवण हें जलधीसी कर्पूर अग्नितें ॥
तात्काळ भेटतांची तद्रूप होति ते । ३ ।
तैसेंची होय येथें मजलाही वाटतें ॥
कळतें हें मज सारें ह्मणुनी आज बोलतें । ४ । ६६ ।

पद चाल ( सोड सोड सोड आतां जानकी म... )

प्राण सखे पूर्ण ब्रह्मज्ञान हें तुला ॥
कां न तरी इच्छिलेंस कृष्ण भेटिला । धृ...
दुःखरूप हा प्रपंच आवडे मला ॥
किती कास आजवरी मोक्ष लाभला । १ ।
तेंच ज्ञान अंतरीं नकां ठसे तुला ।
कठुनि खर व्यर्थ काय भ्रांतिही तुला । २ ।
काय ह्यांत अर्थ असे तां न उमगला ॥
स्पष्टपणें तूंच सांग फोडुनी मला । ३ । ६...

श्लोक ( शार्दुल )

ऐसें ऐकुनि ती सुहास्यवदना बोले सुधन्व्या प्रति ॥
संपादून सुपूर्व थोर नृपती मोक्षास गेले किती ॥
संसारीं रमले उगाच भ्रमले पोटीं नसे संतती ।
ऐसे जे जन ह्या जगीं विचरती मुक्ती नसे त्यां ...

( उपजाति )

हेतू तुझे जे असती मनाचे ॥ असोत सारे पळ एक साचे ॥
आज्ञा पित्याची मज मान्य आहे॥ह्मणुन आतां क्षण हा ... ६...

पद चाल ( श्रीहरी सखया कां रूसलासी )

पतिराया प्रश्नाचें उत्तर द्यावें॥शास्त्र पुराणीं जें वंद्य असावे ।धृ०